

जन्मशताब्दी वर्ष

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेक

२०१८-१९

## विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

NAAC Reaccredited 'A' Grade with CGPA 3.24
Star College by DBT, Govt. of India

May the dream of Peace take flight around the world

मराठी
तेलगु संस्कृत
गुजराथी हिंदी
उर्दु पंजाबी
कन्नड तमिळ

2019 INTERNATIONAL YEAR OF
Indigenous Languages

(स्वायत्त) कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वार्षिक नियतकालिक स्पर्धेत सातत्याने क्रमवारीत स्वत:चा अभिजातपणा ठसविलेले सर्जनशील वार्षिक नियतकालिक.




# विवेक


## संपादक मंडळ

**अध्यक्ष :**
प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर

**संपादक :**
प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी

**विभागीय संपादक :** वरिष्ठ महाविद्यालय

| | |
|---|---|
| मराठी विभाग | प्रा. बी. के. गोसावी |
| हिंदी विभाग | डॉ. ए. एस. महात |
| इंग्रजी विभाग | प्रा. एस. एम. रुईकर |
| विज्ञान विभाग | प्रा. सौ. एस. एच. नदाफ |

**विभागीय संपादक :** कनिष्ठ महाविद्यालय

| | |
|---|---|
| मराठी विभाग | प्रा. सौ. एम. पी. गवळी |
| हिंदी व उर्दु विभाग | प्रा. एम. ए. पिरजादे |
| इंग्रजी विभाग | प्रा. सौ. एस. एस. भोसले |
| संस्कृत विभाग | प्रा. सौ. एम. ए. शिंदे |
| कन्नड विभाग | प्रा. सौ. यु. आर. हिरकुडे |

**जाहिरात विभाग :**

प्रा. किरण पाटील
प्रा. एम. आर. नवले
प्रा. बी. एस. नागनूर
डॉ. सौ. एन. पी. पाटील (ग्रंथपाल)
श्री. एच. एस. साळुंखे (सहाय्यक ग्रंथपाल)

**प्रशासकीय सहाय्य :**

श्री. सी. बी. दोडमणी, (प्रबंधक)
श्री. ए. एस. पवार (कार्यालयीन अधिक्षक)
श्री. बी. आर. करपे
श्री. एस. एच. दुर्गुळे

**मुखपृष्ठ संकल्पना :**
श्री. प्रसाद सुनिल वाघमारे
बी.व्होक, ग्राफिक डिझाईन,भाग- ३

**संपादन सहाय्य :**
डॉ. सौ. पी. ए. पाटील
प्रा. एस. जी. कुलकर्णी
प्रा. डॉ. प्रदिप पाटील
प्रा. बी. के. गावीत
प्रा. सुनिल शिंदे

**छायाचित्रण व अंतर्गत रचना विभाग :**
प्रा. संतोष कुंडले
प्रा. राहुल इंगवले
प्रा. एस. व्ही. देसाई
प्रा. एस. व्ही. उपळावीकर
प्रा. डॉ. एम. एम. कार्जकर

**अहवाल विभाग :**
डॉ. एस. आर. कट्टीमनी
डॉ. डी. आर. तुपे



**मुद्रक :**
श्री मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर
९४२२०४५८५४, ९१५६१२५७७६

# संपादकीय

# जनकल्याणा उजळती लक्षदीप ज्ञानज्योती...

(स्वायत्त) कोल्हापूर




सुजन, रसिक वाचक हो!

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रकाशित झालेला महाविद्यालयीन कामकाजाचा वेध घेणारा भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीचा अविष्कार असणारा शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा 'विवेक' वार्षिक अंक आपल्या हाती सुपूर्द करतांना मनस्वी आनंद होत आहे.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून खेडोपाडी, दुर्गम व शहरी भागात शाळा, महाविद्यालये काढुन गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाचा ज्ञानप्रकाश दिला. त्या ज्ञानरूपी शिक्षणमहर्षींना व त्यांच्यामागे सतत सावली बनून साथसोबत करणाऱ्या संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांना विनम्र अभिवादन !

ज्ञानाची उत्तुंग क्षितिजे पार करताना स्वत्वाची जाणीव करून देणारी डॉ. बापूजी साळुंखे यांची शिकवण बुद्ध, कबीर, फुले, राजर्षी शाहू व आंबेडकरवादी विचारांचा वारसा जतन करणारी आहे. सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा ही पंचशील तत्वे अंगी बाणवून जीवनाची सार्थकता शिक्षणातून साधता आली पाहिजे, हा विचार त्यांनी रूजविला. ''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'' हा शिक्षणाचा मुलमंत्र देणाऱ्या डॉ. बापूजींनी लिहिलेल्या संस्थेच्या प्रार्थनेत मानवतेचा शांतीसंदेश व विश्वबंधुत्त्वाची शिकवण आहे.



श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था गेली ६५ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानदानाची भरीव कामगिरी करून सामाजिक बांधिलकी व राष्ट्रहिताचे प्रेरणादायी कार्य करीत आहे. आज संस्थेची सुमारे ४०६ शैक्षणिक केंद्रे शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहेत. या संस्थेचे अध्यक्ष नामदार चंद्रकांतदादा पाटील यांचे पाठबळ आम्हांस सतत लाभत आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे हे शिक्षणविस्ताराचे कार्य अधिक जोमाने करीत आहेत.

कोल्हापूरच्या शैक्षणिक क्षितिजावर विवेकानंद महाविद्यालयाने आपल्या शैक्षणिक कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटवुन शिक्षण, कला, क्रीडा व साहित्य या सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. गतवर्षी या महाविद्यालयास स्वायत्त (Autonomous) दर्जा प्राप्त झाला आहे. यावर्षी शिवाजी विद्यापिठात सर्वाधिक ९८ विद्यार्थांनी म्हणजेच एकूण विद्यापिठाच्या शिष्यवृत्यांपैकी १३.८४% गुणवत्ता शिष्यवृत्या मिळवून शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. याचा आम्हांस सार्थ अभिमान आहे. दरवर्षी अधिकाधिक विद्यार्थी विद्यापिठाच्या गुणवत्ता यादीत चमकत असतात. याही वर्षी विद्यापिठाच्या गुणवत्ता यादीत ३४ विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिध्द केली आहे. कु. स्वाती संजय पाटील हिने शास्त्रशाखेत ९८% गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. प्रत्येक महाविद्यालयात एखादा INSPIRE Award Scholarship मिळविणारा विद्यार्थी असणे, हा त्या महाविद्यालयाचा सन्मान आहे. आम्हास अभिमान वाटतो की INSPIRE Award Scholarship मिळविणारे तब्बल ५५ विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

क्रीडा क्षेत्रातही या महाविद्यालयाने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. महाविद्यालयाने आजपर्यंत १२ आंतरराष्ट्रीय व २५० हुन अधिक राष्ट्रीय स्तरावरचे खेळाडू घडविले आहेत. श्री. सम्मेद शेटे, बी. कॉम. भाग -२ या विद्यार्थ्याने रशिया व हैद्राबाद येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत नेत्रदिपक यश प्राप्त केले. तो २१३१ गुणांसह ग्रँडमास्टर मानांकनापर्यंत पोहचलेला पश्चिम महाराष्ट्रातील दुसरा खेळाडू आहे. कु. अहिल्या सचिन चव्हाण बी. बी. ए.-भाग १ हिने इजिप्त येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बायथेल व ट्रायथेल या क्रीडा प्रकारात सिल्व्हर मेडल प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विविध क्रीडा प्रकारात एकूण २३ खेळाडुंनी आंतरविभागीय स्पर्धेत सहभाग नोंदविला. शिवाजी विद्यापीठ युवामहोत्सवात महाविद्यालयाने सलग ११ वेळा विद्यापीठ युवामहोत्सवाची जनरल चॅम्पीयनशीप मिळवुन एक उच्चांक प्राप्त केला आहे. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील कलाकारांनी मुंबई दूरदर्शन, वरळी येथे लोकनृत्य कलाप्रकारात सहभाग नोंदविला आहे.

शिवाजी विद्यापीठ प्रतिवर्षी दर्जेदार नियतकालिकांना पुरस्कार प्रदान करते. या स्पर्धेमध्ये गेली ५ वर्षे हे महाविद्यालय अग्रक्रमाने पहिले राहिले आहे. पाच वेळा प्रथम व एक वेळ द्वितीय क्रमांकाचे यश प्राप्त करीत एकुण ६ वेळा महाविद्यालयाने हा विक्रमी किताब प्राप्त केला आहे.'विवेक' नियतकालीक सातत्याने नाविन्यपूर्ण लेखणीने व कलाप्राप्त अविष्काराने लक्षवेधी बनले आहे.

लेखणीच्या कलमाने सृजन साहित्याची निर्मिती करतांना अनेकांचे पाठबळ व प्रोत्साहन लाभत असते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाने व संपादक मंडळातील सर्व सदस्याच्या सहकार्याने या अंकाचे काम दर्जेदार झाले आहे. अंकातील अंतर्गत रचना, फोटोग्राफी, कलादालन यासाठी प्रा. किरण पाटील, प्रा. एस. एस कुंडले, प्रा. एस्.एम रूईकर, प्रा. सतिश उपळावीकर, प्रा. राहुल इंगवले, प्रा. संग्राम देसाई, प्रा. डॉ. एम्. एम्. कारंजकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांचे बहुमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. सी. बी. दोडमणी, अधीक्षक श्री. ए. एस. पवार, श्री. बबन करपे, श्री. सदानंद दुर्गळे या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

या अंकाचे छपाई काम सुबक व दर्जेदार होण्यासाठी मोलाचे सहकार्य करणारे मुरारी मुद्रणालयाचे श्री. प्रदीप, अरविंद व अमोल पडवळे, कॉम्प्युटर विभागाचे काम पहाणारे श्री. गजानन जोशी, प्रतिक प्रिंटर्सचे श्री. धनंजय व सौ. राजश्री पाटील तसेच सृजन डिझायनिंगचे श्री. सुनील सुतार यांचेही आभार व्यक्त करतो.

या अंकासाठी लेखन करणारा व कलादालन समृध्द करणारा विद्यार्थी वर्ग, त्यांना प्रोत्साहन देणारे गुरुदेव या सर्वांनाच मनापासून धन्यवाद देतो.

शिक्षणाचे दिपस्तंभ  
बहुजनांचे कैवारी  
जनकल्याणा उजळती  
लक्षदीप ज्ञानज्योती!



**प्रा.भाऊ काशिनाथ गोसावी**  
**-संपादक**

करणारे डॉ. आप्पासाहेब पवार यांनी साळुंखे घराण्यात या कन्येला बापूजींशी विवाह करायला लावला. सन १९४० साली बेळगावच्या माळावरच्या मारूतीच्या मंदिरात बापूजी व सुशीलादेवी यांचा विवाह संपन्न झाला. सुशीलादेवींच्या वडिलांनी आपल्या लेकीचे कन्यादान करताना, पाणावलेल्या डोळ्यांनी पतीचे व्रतस्थ जीवन सांगून, 'आपल्या पतीला सुखी ठेवून खरी सहचारिणी हो!' असा आशीर्वाद दिला. सत्यम् वद धर्मचर बघता-बघता ८६ वर्षी पर्यंत ही स्त्री संस्थामाता झाली.

बापूजी ज्ञानदानासाठी महाराष्ट्रभर पायाची पायपीट करीत. त्यामुळे सुशीलादेवींच्या अरूणा, अभयकुमार, सुधा, शरद, दीपक, विद्या या भावंडांच्या बाळंतपणात ना पतीची साथ ना सासूची. डॉ. बापूजी साळुंखे यांच्याबरोबर महाराष्ट्रभर त्यांची भटकंती झाली. विंचवाचे बिऱ्हाड घेऊन फिरणाऱ्या सुशीला बाईंची मानसिकता धन थोडे असलं तरी मन सुपाएवढं पाहिजे, अशी होती. त्यांनी ना कधी बापूजीकडे तक्रार केली, ना कधी मागण्या केल्या. हाताला आणि पोटाला चटके बसले तरी कधीही त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता ढळली नाही. एकदा बापूजींना दवाखान्यात ठेवले असताना संस्था, वसतिगृह, घर, शाळा, मुलं सगळी कामे त्या एकट्या निभावत असत. म्हणूनच त्यांना संस्थामाता असे संबोधतात. बापूजींच्या सहवासात त्या बहुश्रुत होत गेल्या. बापूजींनी लावलेल्या विवेकपूर्ण शिक्षण संस्थेच्या या रोपाचा वटवृक्ष झाला. अचानक बापूजींची प्रकृती खालावली. कोणतेही उपचार काम करेनात. आठ वर्ष सुशिला देवींनी बापूजींची सुश्रूषा केली. पण अखेर ८ ऑगस्ट,१९८७ चा काळा दिवस उगवला आणि बापूजी आपल्यातून निघून गेले. बापूजींच्या निधनानंतर एखाद्या संन्यासिनीचे जीवन त्या जगल्या. शिक्षणसंस्थेची सेवा केली. सुशिलादेवी सर्वांगाने आणि सर्वभावाने बापूजींच्या जीवनाशी व संस्थेच्या जीवनाशी तारतम्य पाहून जागल्या म्हणूनच समर्पिता हे विशेषण त्यांच्या नावाशी जोडले जाते. सुशीलादेवी सगळ्या संकटांवर मात करून खंबीरपणे संस्थेची जबाबदारी घेतात, तेव्हा त्या मला पहाटे उगवणाऱ्या सुर्यासारख्या वाटतात. कारण पहाट ही अंधः काराला छेदून उषःकालाकडे जाते, नवे तंत्र घेऊन येते.

त्याग व सेवाभावी वृत्तीतून ज्ञान व विज्ञान देण्याचं काम बापूजींनी केले तर सुसंस्कार देण्याचं काम सुशीला देवींनी केले. अशा या देवरूपी सुशीलादेवींची २२ ऑक्टोबर, २०१३ रोजी संध्याकाळी प्राणज्योत मालवली. हजारो लोकांची माता बनलेल्या व संसारसुखाची सावली देणाऱ्या संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे अनंतात विलीन झाल्या.

■■



# मित्र

*माझ्या भावनांना जपणारा*
*माझ्यावर विश्वास ठेवणारा*
*माझ्या चुका दाखवून देणारा*
*तुमच्यासाठी कायपण! म्हणणारा*
*कोणी मिळेल का? मला मित्र!*

*माझ्यासोबत सावलीसारखा असणारा*
*माझ्यासाठी छोट्या, छोट्या*
*प्रेमाने स्वतः वस्तू तयार करून आणणारा*
*संकट आल्यावर, धाऊन येणारा*
*कोणी मिळेल का? मला मित्र!*

*गुलाबांच्या पाकळ्यासारखा अलगद,*
*माझ्या मनातलं ओळखणारा,*
*नदीप्रमाणे मनातून कोणाताही*
*स्वार्थ न धरता वाहणारा*
*कोणी मिळेल का? मला मित्र।*

*माझ्यावर रूसून बसणारा*
*मी रडायला लागल्यावर*
*माझे अश्रू पुसणारा*
*माझ्या आनंदात आनंद मानणारा,*
*कोणी मिळेल का? मला मित्र!*

*दिसायला चांगला नसला तरी,*
*मनाने सुंदर फुलपाखरा प्रमाणे भरारी घेणारा,*
*माणुसकी, प्रेम, आपुलकी*
*या भावनांमध्ये गुंतून गेलेला*
*कोणी मिळेल का? मला मित्र।*

*समुद्राप्रमाणे चांगले सामावून घेणारा,*
*वाईट दूर करणारा,*
*आमच्या मैत्रीमध्ये*
*संशय हा शब्द नसणारा*
*कोणी मिळेल का?*
*मला मित्र, मिळेल ना?*



संयोगिता संजय पाटील
बी. एस्सी. भाग एक

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार'' - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सुवर्ण महोत्सवी



# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

www.vivekanandcollege.org

NAAC Reaccredited "A" (CGPA 3.24) ▸ College with Potential for Excellence- by U.G.C. ▸ FIST- by DST
STAR College by DBT - Govt. of India

अध्यक्ष



मा.ना.चंद्रकांतदादा पाटील

कार्याध्यक्ष



प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे

## कोल्हापूर बोर्डात प्रथम

चैतन्य कुलकर्णी



96.77% - JEE 211

सचिव



प्राचार्या सौ. शुभांगी गावडे

प्राचार्य



डॉ. एस. वाय. होनगेकर

## १२ वी सायन्स व CET मधील गुणवंत

सर्व गुणवंतांचे अभिनंदन



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनिकेत केसरकर<br>96.15%<br>PCM 145 | मनीष सुतार<br>96.15%<br>JEE 116 | अक्षय राजाज्ञ<br>96%<br>PCM 179 | गौरव कुंभोजकर<br>96%<br>JEE 212 | कु. अंकिता शर्मा<br>95.54%<br>PCB 144 | सर्वेश बोडके<br>95.54%<br>PCM 166 | कु. देवयानी कडव<br>95.38%<br>PCM 128 | कु. गौरी भांदुरगे<br>95.08%<br>PCM 164 | कु. अनिषा मतकर<br>94.92% |



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सत्यम माने<br>94.92%<br>PCM 182 | कु. कनिका देशमुख<br>94.46%<br>PCB 163 | वेदांत शितूरकर<br>94.15%<br>JEE 133 | कु. स्नेहल फराकटे<br>94%<br>PCM 145 | सुभाष मांगले<br>94%<br>PCM 126 | कु. नाझनीन तांबोळी<br>93.85%<br>NEET 489 | स्वप्नील भंडारे<br>93.69%<br>PCM 140 | कु. नुपूर शितूरकर<br>93.69%<br>PCM 138 | कुशांक चव्हाण<br>93.23%<br>PCM 160 | सनी खंडेलवाल<br>93.08%<br>PCB 151 |



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कु. झवेरिया मुतवल्ली<br>92.92%<br>PCM 113 | कु. श्रेया नरवणे<br>92.92%<br>JEE 139 | राहूल पाटील<br>92.92% | प्रणव संकपाळ<br>92.92% | सर्वेश खिरे<br>92.62%<br>PCM 157 | कु. वैष्णवी पाटील<br>92.46% | कु. सिध्दी खेबूडकर<br>92%<br>NEET 453 | विश्वास कुलकर्णी<br>91.23%<br>PCM 162 | केतन भुजंगे<br>89.23%<br>JEE 160 | दिग्विजय देसाई<br>PCM 171 |

## १२ वी आर्टसमधील गुणवंत



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नीरज वेलणकर<br>JEE 163<br>PCM 163 | कु. तेजस्विनी पाटील<br>NEET 495 | कु. आर्या जाधव<br>NEET 490 | कु. आकांक्षा ठाणेकर<br>94.31% | कु. राजनंदिनी साळोखे<br>90.46% | सुशांत चव्हाण<br>89.38% | कु. पूजा कोळकर<br>87.85% | कु. सोनल चाफेकर<br>87.85% | कु. नम्रता शेंबडे<br>87.69% | कु. उर्मिला वांद्रे<br>87.54% |

## १२ वी आर्टसमधील गुणवंत

## १२ वी कॉमर्समधील गुणवंत



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कु. शामल रामशे<br>87.54% | कु. अक्षता पाटील<br>87.38% | कु. स्नेहल बुरसे<br>86.31% | वितराग वळीवडे<br>86.31% | कु. ऋचा परांजपे<br>94.31% | सौरभ भोपळे<br>92.92% | कु. जॉन मेरीना मॅथ्यू<br>92.15% | कु. आदिती चौगुले<br>92% | उमेश हेडाऊ<br>91.38% | कु. मौक्षा शहा<br>91.08% |


MHT-CET मध्ये 150 पेक्षा अधिक गुण मिळविणारे 53, सायन्समध्ये 90% पेक्षा अधिक गुण मिळवणारे 50 व आर्टसमध्ये 80% पेक्षा अधिक गुण मिळवणारे 33 विद्यार्थी !


## विवेक २०१८-२०१९

दि. प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट - नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे निवेदन.

- प्रकाशन स्थळ : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर
  प्रकाशन काळ : वार्षिक
  प्रकाशकाचे नाव : प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर
  राष्ट्रीयत्व : भारतीय
  पत्ता : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क,
  कोल्हापूर - ४१६ ००३
  मोबा. ९४२११९३४५३
- संपादकाचे नाव : प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी
  राष्ट्रीयत्व : भारतीय
  पत्ता : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क,
  कोल्हापूर - ४१६ ००३ मो. ९४२३२७०९४७
- मुद्रक : श्री. अरविंद शंकरराव पडवळे
  पत्ता : श्री मुरारी मुद्रणालय, वाय.पी.पोवार नगर,
  कोल्हापूर फोन : ०२३१-२६९११८१
- संगणक अक्षर रचना : श्री. गजानन अ. जोशी
  राष्ट्रीयत्व : भारतीय
  पत्ता : डी-१९, वाय. पी. पोवार नगर,
  शिवाजी उद्यम नगर, कोल्हापूर. मो. ९९७५१३५३३३
- स्वामित्व : विवेकानंद कॉलेज,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

मी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य आहे. या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रित शोधन विभागीय संपादकांनी केलेले आहे. खाजगी वितरणासाठी.


१००
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
1919-2018